महाराष्ट्र वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या
बदल्या व पदस्थापनेबाबत मार्गदर्शक तत्वे

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
**शासन परिपत्रक क्र. एमएफएस-२०१४/प्र.क्र.५७(भाग-२)/फ-८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ जानेवारी, २०१५

<u>वाचा</u> :-
१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक ३१ जानेवारी, २०१४
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एमएफएस-२०१४/प्र.क्र.५७/फ-८, दिनांक ०७ मे, २०१४
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक ३१ जानेवारी, २०१४
४) शासन अधिसुचना महसूल व वन विभाग क्र. एफएसटी-११/१४/प्र.क्र.६५८/फ-४ दि.८/१२/२०१४
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक १९ जानेवारी, २०१५
६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एमएफएस-२०१४/प्र.क्र.५७/फ-८, दिनांक ३१ / ०१/२०१५

<u>**प्रस्तावना :-**</u>

महाराष्ट्रातील वनक्षेत्र हे मोठ्या प्रमाणात व विखुरलेल्या स्थितीत आहे. सदर वनक्षेत्र अत्यंत दुर्गम भाग व अतिसोयीचा भाग अशा दोन प्रकारचे क्षेत्र वनक्षेत्रामध्ये आहे. अशा वनक्षेत्रातील दुर्गम भागात वन अधिकाऱ्यांनी काम करणे अनिवार्य आहे. कारण सध्या अस्त्विात असलेल्या वनक्षेत्रातून शास्त्रशुध्द पध्दतीने वानिकीचे काम शिकावयास मिळते व असे क्षेत्र हे दुर्गम भागातच आहे. परंतु, या दुर्गम भागात वन अधिकाऱ्यांचे कुटुंबांसाठी वैद्यकीय सेवा, शिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच राज्याच्या सर्वच भागात काम केल्यामुळे त्या भागातील समस्या व त्या सोडविण्यासाठीच्या उपाययोजना हया बाबतच्या अनुभवाचा फायदा वेगवेगळया विभागात वनविकासाची व वनसंवर्धनाची कामे करतांना होऊ शकतो. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करुन भारतीय वन सेवा ते महाराष्ट्र वन सेवेतील अधिकारी कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांना न्याय मिळेल या दृष्टीने वनक्षेत्रातील सर्व पदांच्या पदस्थापना व बदलीसाठी तीन भागात वर्गवारी करण्यात येत आहे.

**“अ” वर्ग :- वन अधिकाऱ्यांच्या कुटुंबाकरीता सर्व सुविधायुक्त असलेले सोईस्कर ठिकाण आणि मर्यादित वन असलेले क्षेत्र-**

पुणे (सर्व वन विभाग), कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक (सर्व वन विभाग), औरंगाबाद, ठाणे (सर्व वन विभाग), रायगड (सर्व वन विभाग), नागपूर आणि अमरावती.

**“ब” वर्ग :- थोडया सुविधा असलेले आणि कमी वनक्षेत्र असलेल्या छोट्या शहरांचे मुख्यालय.**

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, जळगांव, अहमदनगर, धुळे, बुलढाणा, औरंगाबाद (वनवृत्त व्यतिरिक्त सर्व वन विभाग) तसेच वर्ग “अ” व वर्ग “क” वगळून सर्व वनक्षेत्र.

**“क” वर्ग :- वन अधिकाऱ्यांच्या कुटूंबांना मर्यादित नागरी सेवा उपलब्ध असलेले आणि घनदाट जंगल आणि दुर्गम भागामध्ये असलेले वन विभाग**

गडचिरोली (सर्व वन विभाग), गोंदिया,मेळघाट (सर्व वन विभाग), मेवासी आणि तळोदा, पांढरकवडा, पुसद, ब्रम्हपूरी, मध्य चांदा आणि यावल.

**१) सरळसेवेमधून आलेल्या वनक्षेत्रपाल व सहायक वनसंरक्षकांच्या नियुक्तीबाबत -**

सरळसेवेतून नियुक्त झालेल्या वनक्षेत्रपाल व सहायक वनसंरक्षक या संवर्गातील अधिकाऱ्यांची त्यांच्या विभागीय महसूली संवर्ग वाटपाच्या अधीन राहून प्रथम नियुक्ती ३ वर्षे कालावधीकरीता “क” वर्गाच्या विभागामधील परिक्षेत्रामध्ये करण्यात यावी. सदरहू ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर या अधिकाऱ्यांचा त्यांच्या विभागीय महसूली संवर्गातील “अ” आणि “ब” वर्गातील भागात नियुक्ती करण्याचा विचार करता येईल. पदाच्या अनुलब्धतेमुळे प्रथम नियुक्तीच्यावेळी “क” वर्गाच्या विभागात नियुक्ती करता आली नसल्यास, ३ वर्षाचा कालावधी झाल्यानंतर या अधिकाऱ्यांना “क” क्षेत्रात नियुक्ती देण्यात यावी.

**२) पदोन्नतीने देण्यात आलेल्या वनक्षेत्रपाल, सहायक वनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत :-**

वनक्षेत्रपाल, सहायक वनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी या संवर्गात पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांना महसूली विभागीय संवर्ग वाटपाच्या अधीन राहून त्यांच्या स्वेच्छेने पहिली नियुक्ती किमान ३ वर्षासाठी “क” वर्गाच्या विभागामध्ये देण्यात यावी. सदर ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अशा अधिकाऱ्यांना त्यांच्या विभागीय महसुली संवर्ग वाटपानुसार व पदाच्या उपलब्धतेनुसार “अ” किंवा “ब”विभागातील क्षेत्रिय पदावर नियुक्तीसाठी विचार करण्यात यावा. तथापि, स्वेच्छेने “क” वर्गाच्या विभागात सेवा करण्यास तयार नसलेल्या अधिकाऱ्यांचा “ब” वर्गाच्या विभागामध्ये किमान ६ वर्ष काम केल्यानंतर “अ” विभागातील पदावर नियुक्तीसाठी विचार करण्यात यावा. तसेच पदाच्या उपलब्धतेअभावी, पदोन्नतीनंतर “अ” वर्गाच्या विभागात पदस्थापना देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचा सदर विभागातील ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या विभागीय महसूली संवर्गाच्या अधीन राहून त्यांचा “क” व “ब” वर्गाच्या विभागात पदस्थापनेसाठी विचार करण्यात यावा.

**३)** वन्यजीव विभाग तसेच वन विभागाच्या प्रशिक्षण संस्थामध्ये वनक्षेत्रपाल व सहायक वनसंरक्षक या दर्जाच्या पदावर किमान ३ वर्षे काम केलेल्या अधिकाऱ्यांचा त्यांच्या विभागीय महसूली संवर्गाच्या अधीन राहून “अ” वर्गाच्या विभागासाठी विचार करण्यात यावा.

४) सेवानिवृत्तीस ३ वर्षापेक्षा कमी कालावधी असलेल्या वनक्षेत्रपाल, सहायक वनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी या अधिकाऱ्यांचा वन्यजीव अभयारण्यामध्ये किंवा “क” वर्ग विभागामध्ये पदावर पदस्थापनेसाठी शक्यतो विचार करण्यात येऊ नये.

५) वनक्षेत्रपाल संवर्गातून सहायक वनसंरक्षक संवर्गात पदोन्नतीकरिता मागच्या दहा वर्षात किमान तीन वर्ष -क॰ वर्ग किंवा वन्यजीव विभागातील परिक्षेत्रात काम केलेले अधिकारी पात्र असतील. सदरची तरतुद ही सन २०१८-१९ या वर्षाच्या निवडसुचीपासून लागू राहील. वनक्षेत्रपाल संवर्गातील ज्येष्ठता सूचीमधील अधिका-यांना क वर्ग विभागातील वनपरिक्षेत्रात पदाच्या उपलब्धतेनुसार आणि ज्येष्ठतेनुसार पदस्थपना देण्यात येईल. तसेच सहायक वनसंरक्षक संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र/विचारक्षेत्रात असणा-या वनक्षेत्रपाल यांनी -क - वर्ग विभागातील वनपरिक्षेत्रात पदस्थापना करण्याबाबत स्वेच्छेने मागणी करणे आवश्यक राहील. अशी मागणी न केल्यास शासन स्वतःहून पदस्थापना देईल. सदरची पदस्थापना ही विभागीय संवर्ग वाटपाच्या अधीन राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक संकेताक २०१५०२०४१२०१३०८९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2015.02.04 14:47:55 +05'30'

**(द.ल.थोरात)**
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

**प्रति :-**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजी), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित, नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन -दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव)
१०) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १२), मंत्रालय, मुंबई-३२.
११) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१२) मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१३) वन विभागातील सर्व कार्यासने
१४) निवड नस्ती (फ-८ कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.